# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनीक्र./फॅक्सक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gug.registrar@gmail.com

जा.क्र. /गोंविग/कुसका/ ३७६० /२०२४ दि. ३०/०४/२०२४

## परीपत्रक

**विषय - महाविद्यालयातील युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी कौशल्य विकास केंद्र स्थापन करणेकरिता पुढाकार घेण्यासाठी आवाहन करणेबावत.**

**संदर्भ -** म.रा.कौ.वि.सो.यांचे पत्र क्र.MSSDS/२०२३-२४/१५६१, दिनांक २२/०४/२०२४ नूसार.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांनी आपल्या महाविद्यालयामध्ये " ***आचार्य चाणाक्य कौशल्य विकास केंद्र*** " स्थापन करण्याकरिता गुगल फॉर्म तयार केलेला आहे. सदर फॉर्म दिनांक ३० एप्रिल, २०२४ पर्यंत गुगल फॉर्म मधील लिस्ट - B मध्ये नमुद असलेल्या Future Skill Job Roles चा प्राधान्याने विचार करुन अर्ज करावयाचे असल्याचे संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविलेले आहे.

त्यामुळे या परिपत्रकाद्वारे सर्व महाविद्यालयांनी संदर्भीय पत्राच्या सुचनेनुसार आपल्या महाविद्यालयाकरिता आवश्यक ती माहिती गुगल फॉर्म मध्ये भरुन सदर योजनेसाठी विहीत मुदतीत अर्ज ***Google Form Link : https://forms.gle/kUzlW7bFEFyq26bc7*** या लिंक व्दारे सादर करावी.

सहपत्र :- संलग्नप्रमाणे.

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी
पहिला मजला ,एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर,
३ ,महापालिका मार्ग ,धोबी तलाव, मुंबई - ४००००१
ईमेल: ceo@mssds.in दूरध्वनी क्र. ०२२- २२६२५६५१/५३

जा.क्र. MSSDS/२०२३-२४/१५६१ दि:२२/०४/२०२४

प्रति,
मा. कुलगुरू,
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.

विषय- आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी कौशल्य विकास केंद्र स्थापन करणेकरीता पुढाकार घेण्यासाठी आवाहन करणेबाबत ...

रोजगाराबाबत बदलत्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थितीत कौशल्य विकास व उद्योजकतेस अधिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाने माहे जानेवारी २०१५ मध्ये स्वतंत्र कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाची स्थापना केली आहे.

बेरोजगार उमेदवारांना विविध क्षेत्रांमधील रोजगार उपलब्ध करुन देणे, स्वयंरोजगार करु इच्छिणा-या उमेदवारांना अर्थसहाय्य प्रदान करणे, कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून उमेदवारांना रोजगारक्षम बनविणे ही सध्याच्या काळाची गरज पूर्ण करण्याच्या हेतूने राज्य शासनाच्या तसेच केंद्र शासनातील विविध विभागांतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षणाशी निगडीत सर्व योजना व कार्यक्रमांखाली निधीची सांगड घालून एकात्मिक अंमलबजावणीद्वारे कार्यप्रवण वयोगटातील (१५-४५ वर्षापर्यंतच्या वयोगटातील) उमेदवारांचे अधिक मागणी असलेल्या क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार व्यावसायिक कौशल्य विकास (Skill Development), कौशल्य वर्धन (Up-skilling), पुनर्कौशल्य विकास (Reskilling) करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत केंद्र, राज्य व जिल्हा पुरस्कृत विविध कौशल्य विकास प्रशिक्षण योजनांच्या माध्यमातून राज्यातील १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना विविध ३७ क्षेत्रामध्ये (बँकिंग, माहिती तंत्रज्ञान, बांधकाम, ईलेक्ट्रॉनिक्स, रिटेल, वित्त इ.) कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनवून रोजगार अथवा स्वयंरोजगाराच्या संधी पुरविण्यात येतात.

National Skills Qualification Framework (NSQF) अन्वये स्थापित मानकांनुसार १२०० पेक्षा अधिक व्यावसायिक अभ्यासक्रमाचे संबंधित प्रशिक्षण संस्थांमार्फत उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येत असून सदर

कौशल्य प्रशिक्षण NCrF प्रणालीशी निगडीत आहे. प्रशिक्षणाअंती उमेदवारांचे मूल्यमापन (Assessment) आणि प्रमाणीकरण (Certification) हे केंद्र शासनाच्या National Council for Vocational Education Training-NCVET, National Skill Development Corporation-NSDC आणि Sector Skill Councils (SSC) कडील मान्यताप्राप्त मूल्यमापन संस्था (Assessing Body) मार्फत करण्यात येते. सदर प्रमाणपत्र राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त असून ह्या अभ्यासक्रमांमध्ये Vertical व Horizantal Mobility अंतर्भूत आहे.

महाराष्ट्र शासनाने महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी **"आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र"** ही नाविन्यपूर्ण योजना सुरु केली आहे. आपल्या महाविद्यालयात कौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करून १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना कौशल्य प्रशिक्षण प्रदान करून त्यांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. या करीता केंद्र शासनामार्फत निश्चित केलेल्या Common Cost Norms नुसार कौशल्य विकास केंद्रांना विविध टप्प्यांमध्ये प्रती प्रशिक्षणार्थी सरासरी रु.९००० ते १५००० /- पर्यंत प्रशिक्षण शुल्क अदा करण्यात येते.

आपल्या विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र"स्थापन करण्याचा राज्य शासनाचा मनोदय आहे. या करीता गुगल फॉर्म लिंक तयार करण्यात आली असून त्याद्वारे आपल्या महाविद्यालयामध्ये "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र" स्थापन करण्यासाठी दि.३० एप्रिल, २०२४ पर्यंत अर्ज करावयाचा आहे. त्याचप्रमाणे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यासाठी गुगल फॉर्ममधील लिस्ट-B मध्ये नमूद असलेल्या Future Skill Job Roles चा प्राधान्याने विचार करण्यासाठी प्रवृत्त करावे.

उक्त योजनेबाबत अधिक माहितीसाठी आमच्या कार्यालयातील श्री. विनय काटोलकर, कौशल्य अभियान अधिकारी-१ [(7066603419) (smo1a@mssds.in)] आणि श्री. श्रीजन तायडे, यंग प्रोफेशनल [(8412828144) (ypf.shrijan@gmail.com)] यांचेशी संपर्क साधावा. तसेच, आपल्या कार्यालयातील एका अधिकाऱ्याला या योजनेसाठी समन्वयक अधिकारी म्हणून घोषित करून सोसायटी कार्यालयास कळविल्यास ACKVK योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे शक्य होईल

आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना गुगल फॉर्ममधील आवश्यक ती माहिती भरून सदर योजनेसाठी विहित मुदतीत अर्ज करणेबाबत आपल्यास्तरावरून आवाहन करावे, हि विनंती.

[Google form Link : https://forms.gle/kUz1W7bFEFyq26bc7 ]

आपली

(निधी चौधरी. भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी